13:32:52 **स. फौ.ख .नं. ९७९/२०२४**

म. सरकार वि. सुरेश हिंदुराव समुद्रे

**निशाण नं. १२/क**

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.१</u>**

नाव – अजिंक्य आनंदा जाधव

वय –४० वर्षे

व्यवसाय – सध्या नेमणुक पन्हाळा पोलीस स्टेशन.

पत्ता – तळसंदे ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

**<u>सरतपास सरकारतर्फे सहा. सरकारी वकील श्रीमती डी. बी. पाटील यांचेतर्फे शपथेवर सुरु,</u>**

१. मी कोडोली पोलीस स्टेशन येथे २०१८ ते सन २०२४ या कालावधीत कार्यरत होतो. दि. ३१.१२.२०२३ रोजी ३१ डिसेंबर व नववर्ष स्वागताच्या अनुषंगाने मी तसेच दुसरे पोलीस अधिकारी डोईजड, माने, पो. कॉ. १५५० पाटील, पो. कॉ. पाटील ७८८ व महामार्ग पोलीस मदत केंद्र आंबा पोलीस हवालदार कुंभार व पो. ना. पाटील असे सरकारी वाहनाने पेट्रोलिंग व नाकाबंदीकरिता रवाना झालो. नाकाबंदी दरम्यान आम्ही एम एस इ बी फाटा कोडोली येथे नाकाबंदी दरम्यान वाहतूक केसेस करत असताना आमचे समक्ष दुचाकी वाहन आले त्यास आम्ही थांबविले. त्याचा क्र. एम एच ०९ एफ टी ०६४१असा होता. त्यावरील चालकास त्याचे नाव व पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव सुरेश हिंदुराव समुद्रे रा. बोरपाडळे असे सांगितले. त्या इसमास दारुचा उग्र वास येत असल्यामुळे त्याचा मला दारु पिलाचा संशय आल्यामुळे स. पो. नि. डोईजड यांनी १२.३६ वा. दरम्याने ब्रिथ अनालाईजर मशीनने तपासणी केली असता, त्या मशीनमधील प्रिंटवर ५५०.०/१००

मिली (Positive) असे दारु सेवन केल्याचे दिसून आले. त्याबाबतचा सविस्तर पंचनामा आम्ही पो. ह. माने यांनी दोन पंचांसमक्ष केला. त्यानंतर सदर इसम हा त्याचे ताबेतील वाहन हयगयीने निष्काळजीपणे दारु पीत चालवित आढळलेला असल्यामुळे मी त्याचे विरुद्ध कोडोली पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली. आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद व प्रथमवर्दी तीच आहे. त्यावर माझ्या सहया आहेत. त्यातील मजकूर माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि. १३ नि. १४** देण्यात येत आहे. सदर घटनेवेळी रात्री १२ नंतर ब्रेथ अनालाईजर टेस्ट केली असल्यामुळे त्यावर दि. ०१.०१.२०२४ अशी दिसून येत आहे. ब्रिथ अनालाईजर मशीनमधून काढलेली प्रिंट मी पाहिलेली होती. त्यावर माझे समक्ष आरोपी याची सही घेण्यात आलेली होती. सदर प्रिंट ही स्पष्टपणे दिसून येत नाही कारण त्यावरील शाई ही उडून जाते. ती मूळ कागदावर तशीच राहत नाही. जो इसम दारु पिवून निष्काळजीपणे गाडी चालवत होता त्याला पाहिल्यास मी ओळखू शकतो. सदर इसम आजरोजी न्यायालयात हजर आहे. तसेच सदर इसम जी गाडी चालवित होता ती पाहिल्यास मी ओळखू शकतो.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे वकील एस. एन. पाटील यांचे मार्फत सुरु,**

२. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही एम एस ई बी फाटा कोडोली येथे केसेस दाखल करण्याकरिता थांबलो होतो. सदर पेट्रोलिंगकरिता बाहेर पडताना मी हालचाल रजिस्टरला नोंद केली होती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी यास मी थांबा असे सांगितल्यानंतर तो थांबला. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी गाडी चालवत असताना तो कोणाला धडकला किंवा इजा केली असे घडली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीमुळे कोणाचा अपघात झाला असे घडले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर आरोपीस सरकारी दवाखान्यात नेवून त्याची वैद्यकीय तपासणी आम्हाला करता आली असती. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही काढलेल्या ब्रिथ अनालाईजर प्रिंटवरती कोणताही मजकूर नमूद नव्हता. हे म्हणणे

खरे नाही की, अशा प्रकारचे ५५०.०/१०० मिली (Positive) कोणतेही परिमान मशीनवर आले नव्हते. सदर केलेल्या कार्यवाहीचे व्हीडियोग्राफी किंवा सेपरेट फोटो काढायला आम्हाला अडचण नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, दि. ३१.१२.२०२३ रोजी पेट्रोलिंगकरण्याकरिता मी व माझे वरिष्ठ एम एस ई बी फाटा कोडोली येथे थांबल्याचे खोटे सांगतो. हे म्हणणे खरे नाही की, केवळ केसस दाखल करण्याच्या हेतूने कोटा पूर्ण करण्याच्या उद्देशाने सदर आरोपी विरुद्ध मी खोटी व चुकीची फिर्याद दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या वरिष्ठांच्या आदेशानुसार आरोपीविरुद्ध खोटी फिर्याद दाखल केली आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

13:50:25

श्रवणोत्तर स्विकृत ,

सही/-
**(के.दि.काकतकर)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,पन्हाळा

दिनांक. ०७.०४.२०२६